# माझी शाळा

**डॉ. जयंत नारळीकर**
'आयुका', पोस्ट बॉक्स नं. ४, गणेशखिंड, पुणे ४११००७

**ते हि नो दिवसा गताः।**

*शालेय जीवनातील आठवणी 'रम्य' असतात. त्या काळातील अनुभवांची वर्तमानाशी सांगड घालताना त्यातील गोडी दुणावते . त्या आठवणी नवी उभारी देऊन जातात.*

शालेय आठवणी गोड असू शकतात आणि आंबटही.. सारख्या आठवाव्या अशा आणि शक्य तितक्या लवकर विसरून जाव्यात अशाही. माझ्या दोनही प्रकारच्या आठवणी तराजूच्या पारड्यात घातल्या तर गोड आठवणींचे पारडे नक्कीच खाली जाईल.

माझी शाळा 'युनिव्हर्सिटी चिल्ड्रेन्स स्कूल' ही बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या आवारात होती. बहुतेक मुलांचे वडील विद्यापीठात अध्यापक किंवा शिक्षकेतर कर्मचारी असत. आमच्या शाळेत जेमतेम ३५० मुले असतील.... मॅट्रिकपर्यंत. आमची शाळा सुरुवातीला सहाव्या इयत्तेपर्यंत होती. मी आणि माझा धाकटा भाऊ अनंत पुढच्या वर्गात जसजसे चढत गेलो तशी शाळेचीही वाढ होत गेली. मी पाचवीत गेलो तेव्हा शाळेत सातवीचा वर्ग सुरू झाला, सहावीत गेल्यावर शाळा आठवीपर्यंत सरकली आणि ह्याच क्रमाने शाळेची मॅट्रिकची पहिली बॅच तयार झाली, तेव्हा मी आठवीत होतो.

शाळा दहा मिनिटांच्या (चालत जाण्याच्या) अंतरावर होती. आमचे 'बस्ते' (दप्तरे) खांद्यावर सहज पेलण्यासारखे होते... आजकालच्या दप्तरांच्या तुलनेत हलकेच! अनंत आणि मी पावणेदहाला सकाळचे जेवण घेत असू. जेवून दप्तरे घेऊन शाळेत १०.२० पर्यंत पोहोचायचे असे. कारण १०.२५ ला पहिली घंटा होऊन, 'हाजिरी' झाल्यावर प्रार्थनेसाठी सगळे विद्यार्थी समोरच्या पटांगणात जमत. प्रार्थनेनंतर तास सुरू होत. साधारण ४०-४५ मिनिटांचे सात तास असत आणि मध्ये १० व २० मिनिटांच्या दोन 'रिसेस.' काही विद्यार्थी २० मिनिटांच्या रिसेस मध्ये डबा खात. पण अनंत आणि मी लवकर जेवून शाळेत जात असल्याने डब्याच्या फंदात पडत नसू. मात्र शाळा संपून साधारण सव्वाचार वाजता घरी येताना सप्पाटून भूक लागलेली असे. मग घरी आल्यावर चहा

बरोबर काहीतरी भरगच्च नाश्ता होई.

शाळेतल्या पहिल्याच वर्षी 'इन्फंट क्लास'मधून पहिल्या इयत्तेत मला डबल प्रमोशन मिळाले. तेव्हा पहिलीतल्या पहिल्या काही महिन्यांचा अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी मला घरी शिकवणी करायला 'पांडेजी' म्हणून शाळेतले शिक्षक येऊ लागले. मी दुसरीत असेपर्यंत ते येत असत. त्यानंतर शाळेतला अभ्यासक्रम पुरा करायला मला कधी शिकवणीची गरज पडली नाही.

माझ्या पहिल्यावहिल्या आठवणीतील एक! जेव्हा शिकवणी ठरविण्यासाठी पांडेजी आमच्या घरी आले तेव्हा हिवाळ्याची सुरुवात झाली होती. मला वाटते डिसेंबरची सुरुवात असावी. चैन आणि गंमत म्हणून मी व अनंत दोन मोठ्या पिंपात गरम पाणी भरून त्यात डुंबत असू. सकाळच्या थंडीत उन्हात पिंप ठेवून डुंबत बसण्यात मजा वाटे. एकदा असे आम्ही पाण्यात उघडेबंब बसलो असताना समोर एकदम शिक्षक आलेले पाहून आमची तिरपीट उडाली. मी डोके शक्य तितके खाली करून पिंपात लपण्याचा प्रयत्न केल्याचे आठवते.

## वर्गातले स्थान

अशीच, प्राथमिक शाळेतल्या आठवणींतली आणखी एक आठवण माझ्या परीक्षेतल्या निकालाशी जोडलेली आहे. ऐन उन्हाळ्यात मे महिन्याच्या आरंभी निकाल मिळायचा. पहिल्या इयत्तेच्या वार्षिक परीक्षेचा निकाल घ्यायला मी वडिलांच्या बरोबर गेलो होतो. फार उष्णता (तापमान १०५°-११०° फॅरनहाईटच्या जवळपास असणार) म्हणून रिक्षा केली होती. बनारसमध्ये त्या काळी सायकल रिक्षा, घोड्याचा एक्का किंवा टांगा अशी वाहने असायची. निकालपत्र घेऊन आम्ही परत येत असताना वडिलांनी ते वाचून दाखविले. माझा आठवा नंबर आला होता. हा क्रमांक चांगला का वाईट यावर त्यांनी माझ्यापुढे काही भाष्य केले नाही. त्यांनी वाचलेले मार्क ऐकून मलाही काही बोध झाल्याचे आठवत नाही. कदाचित् डबल प्रमोशन मिळाल्यावर त्या वर्षी तरी आईवडिलांनी माझ्याकडून फार अपेक्षा केली नसेल.

मात्र दुसरीच्या परीक्षेत माझा पहिला नंबर आला तेव्हा त्या दोघांनी माझे केलेले कौतुक, तसेच शिक्षकांच्या शाबासक्या यावरून **पहिला नंबर येणे म्हणजे काहीतरी खास हे माझ्या मनात बिंबले व तेव्हाच मला वाटले की आता पुढच्या परीक्षेत पहिला नंबर सोडायचा नाही.**

परंतु निर्धार केला तरी सर्वच गोष्टी आपल्या हातात नसतात याचा अनुभव मला त्या नंतरच्या वर्षीच आला. तिसरीत असताना वर्गातल्या परीक्षांत मी पहिला यायला सुरुवात केली, पण सहामाही परीक्षेच्या महिनाभर आधी मी आजारी पडलो. हा आजार जवळजवळ परीक्षा संपेपर्यंत टिकला. केवळ ड्रॉइंग आणि म्युझिकच्या परीक्षा मी देऊ शकलो. पुढे वार्षिक परीक्षेत जरी मी पहिला आलो तरी एकूण सहामाही व वार्षिक परीक्षांचे

गुण मिळवून क्रमवारी ठरत असल्याने मी वर्गात चौथा का पाचवाच येऊ शकलो.

पुढील वर्षापासून म्हणजे चौथ्या इयत्तेपासून माझा पहिला नंबर कायम झाला. मात्र तो टिकवण्यासाठी माझा सहाध्यायी अनंत दासन्नाचार्य (याला आम्ही मित्रगण 'पापू' ह्या टोपण नावाने संबोधत असू) याच्याशी मला नेहमीच जोराची टक्कर द्यावी लागली. सहावीत असताना एका टर्मिनल परीक्षेत केवळ 'हिंदी'चा निकाल बाहेर येईपर्यंत तो सव्वातीन मार्कांनी माझ्या पुढे होता. हिंदी हा विषय माझ्या चांगल्या तयारीचा असल्याने ह्या पेपरात मी ही तूट भरून काढेन अशी मला आशा होती. निकाल जाहीर झाला तेव्हा पापूला १५ तर मला १८$\frac{१}{२}$ मार्क मिळाले होते... म्हणजे **निव्वळ पाव मार्काने माझा पहिला नंबर टिकला होता!**

## खेळ आणि इतर करमणूक

वर्गात पहिला येणारा म्हणून मला 'स्कॉलर'पासून 'पुस्तकी किडा' पर्यंत विशेषणे मिळत राहिली. मला एकूणच वाचनाचा नाद असला तरी त्याबरोबर खेळही आवडत.

शाळेत वार्षिक 'स्पोर्टस् व अॅथलेटिक्स' मध्ये आम्ही भाग घेत असू. त्यात 'गणिताच्या रेस'मध्ये मी सातत्याने तीन वर्षे भाग घेऊन पहिले पारितोषिक पटकावले. ह्यात **तीन पल्ले पळून प्रत्येक पल्ल्यानंतर गणिताचा एक कूट प्रश्न सोडवून पुढचा पल्ला गाठायचा असे. अर्थात पळण्याच्या चपळतेपेक्षा शीघ्र गणित सोडविण्याला ह्या रेसमध्ये अधिक महत्त्व होते.**

शाळेत वर्गावर्गांत 'अंताक्षरी प्रतियोगिता' व्हायच्या. हिंदी कवितांच्या अंताक्षरीत पहिल्यांदा भाग घेताना आमची इयत्ता गडगडली. तेव्हा वर्गशिक्षकांनी आम्हाला समज दिली. त्यांनी 'स्ट्रॅटेजी' म्हणून **वर्गातल्या प्रत्येक मुलावर एक / दोन अक्षरांची जबाबदारी सोपवली. ते अक्षर अंताक्षरीत आले की त्याने सुरू होणारी कविता म्हणायची जबाबदारी त्या मुलाची. अशी तयारी करून आमचा वर्ग सामन्यात उतरला आणि अजिंक्य ठरला.**

अशीच एकदा संस्कृत श्लोकांची अंताक्षरी करायची ठरले. त्यावेळी आम्हाला संस्कृत विषय असल्याने पाठ्यपुस्तकात सुभाषिते होतीच. पण माझे घरचे पाठांतर जबरदस्त असल्याने जवळजवळ मी एकट्याने आमच्या वर्गाला सामन्यात जिंकवले. त्यावेळी सन्माननीय पाहुणे म्हणून पंडित राजकुमार चौबे उपस्थित होते. (ह्या विद्वानांची ख्याती म्हणजे त्यांनी १५ विषयांत एम.ए. करून एक जागतिक उच्चांक गाठला होता.) चौबेजींनी माझी पाठ थोपटून मला आणखी श्लोक म्हणायचे आवाहन केले. त्यावेळी कालिदास, शंकराचार्य यांचे तसेच भगवद्गीता आदीतले श्लोक म्हणून मी त्यांना चकित केले.

## शिक्षक आणि शिक्षणपद्धती

अर्थात आम्हाला मिळालेले शिक्षक सर्वच सारखे होते असे नाही. जो विषय आपण

शिकवितो त्यात स्वतःला किती रस आहे, समोर बसलेल्या विद्यार्थ्यांना तो कितपत समजतो याची जाणीव शिकविणाऱ्याला असणे आणि विद्यार्थ्यांना त्यातल्या खुब्या सांगण्याची तळमळ असणे या सर्वच बाबतीत शिक्षका-शिक्षकांत फरक असतो. पण ह्या तीनही बाबतींत उच्च दर्जाचे असे काही शिक्षक आजही आठवतात.

एकदा सेकंडरी भागात, मला वाटते आठवीत असताना नेहमीचे शिक्षक हजर नसल्याने हेडमास्तरांनी प्रायमरी विभागातले एक शिक्षक तास घ्यायला पाठविले. हे रामनाथ मिश्रा नावाचे शिक्षक खेड्यातून आलेले आणि बोलण्याचालण्यात तिथली छाप असलेले. म्हणून आम्हा 'शहरी' मुलांना त्यांची थट्टा करावीशी वाटत होती. 'हे तिसरीचे शिक्षक आम्हाला कसली गणिते घालणार?' **आमचा हा 'अहंकार' त्यांनी पहिल्या दहा मिनिटांतच घालवला.** 'ही तीन गणिते सोडवा' म्हणत त्यांनी फळ्यावर तीन प्रश्न लिहिले. ते अंकगणिताचे प्रश्न होते. पण आम्हाला वाटले की बीजगणित वापरून ते चटकन सुटतील. मात्र आम्ही त्या X, Y, Z च्या जंजाळात असे अडकलो की बाहेर येता येईना. **तास संपायला पाच मिनिटे असताना त्यांनी अंकगणिताच्या खुब्या वापरून ती गणिते चुटकीसारखी सोडवून दाखविली.** 'तुमचे बीजगणित बासनात गुंडाळून ठेवा' असे सांगून हसत हसत ते तास संपवून बाहेर पडले आणि गणितात स्वतःला रथी-महारथी समजणारे आम्ही (मी, पापू वगैरे) पडलेल्या चेहऱ्याने आमच्या वह्या पाहात राहिलो.

**गणित सोडवायला अनेक मार्ग असले तरी काही मार्ग विशेष सरल-सहज-सुंदर असतात याची जाणीव मला तेव्हा झाली.**

त्यांनी दिलेले प्रश्न नेमके काय होते ते आज सर्वच्या सर्व आठवत नाहीत. पण एक आठवतोय तो असा होता :

'एक माणूस दुपारी तीन व चारच्या दरम्यान घरातून बाहेर पडला आणि सायंकाळी सात व आठच्या दरम्यान परतला. तो निघाला तेव्हा आणि परतला तेव्हा घड्याळाच्या काट्यांनी आपल्या जागा एकमेकांत बदलल्या होत्या. तर तो किती काळ घराबाहेर होता?'

त्यांचा एक प्रश्न हौदात पाणी भरणाऱ्या व बाहेर काढणाऱ्या नळांबद्दल होता, पण आता नक्की आठवत नाही.

आजच्या शालेय पाठ्यक्रमातली सगळ्यात मोठी चूक म्हणजे विषय समजण्यावर भर न देता त्यांत भरगच्च माहिती भरून ती पाठ करण्याला महत्त्व देणे. माहिती हवी असेल तेव्हा विविध स्रोतांकडून - डिक्शनरी, विश्वकोष, वेबसाइट आदी - मिळू शकते. मात्र मुळात विषयच कळला नसेल तर ही माहिती निरर्थक ठरते. पण परीक्षेतले प्रश्न अशा माहितीबद्दल असल्याने परीक्षा जवळ आली की पाठांतर करून विद्यार्थी ती माहिती उत्तरात लिहितात आणि मार्क मिळवितात. पुढे निकाल लागेपर्यंत ती माहिती ते विसरून गेलेले असतात. **प्रत्यक्ष संवादातून,**

**विद्यार्थ्यांना त्यांनी लिहिलेले उत्तर नीट कळले आहे का याची खात्री करून घेणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे.**

प्रत्यक्षात शिक्षकाला हे काही करायला वेळ नसतो. लिहिलेल्या ओळीत अक्षरे नीट काढलीत ना? स्पेलिंगच्या किती चुका आहेत? हेच पाहिले जाते. ह्या 'कर्मकांडा'मागे दडलेली विषयाची खुबी बाहेर येतच नाही.

*माझ्या लहानपणी पाठ्यक्रम असा भरगच्च नसल्याने विद्यार्थी-शिक्षक संवादाला वेळ असे. गणिताचे शिक्षक भूमितीतले एखादे प्रमेय दोन तीन पद्धतींनी सोडवून दाखवू शकत. संस्कृतचे शिक्षक श्लोकाचा अर्थ सांगताना त्याच्या पार्श्वभूमीची किंवा पदलालित्याची चर्चा करत. सायन्स शिक्षक प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवीत. सायफन कसे काम करते हे जेव्हा मी वर्गातल्या प्रयोगात पाहिले तेव्हा पाणी वर चढून खाली येते हा प्रकार मला जादूसारखा वाटला. तो प्रयोग पाहून जितका परिणामकारक वाटला तितका पुस्तक वाचून वाटला नसता आणि केवळ पाठ करून तर नाहीच नाही.*

एकदा दहावीतल्या सहामाहीत पायथॅगोरसचे प्रमेय विचारले असता मी त्याची सिद्धता वेगळ्या प्रकाराने लिहिली. हा प्रकार मीच विचार करून शोधला होता. मला उत्तरासाठी पूर्ण गुण मिळाले. परंतु शिक्षकांनी मुद्दाम बोलावून शाबासकी देताना एक सौम्य सूचनाही केली.

''मॅट्रिकच्या परीक्षेत मात्र पुस्तकात दिलेलीच सिद्धता लिही.''

मी खट्टू होऊन विचारले,

''का? माझी सिद्धता चांगली नाही का? नेहमीच्या लांबलचक पद्धतीपेक्षा ती बरीच छोटी आहे.''

''तुझे उत्तर बिनचूक आहे.'' शिक्षक म्हणाले, ''पण मॅट्रिकच्या परीक्षकाला पुष्कळ उत्तरपत्रिका तपासायच्या असतात. त्याला प्रश्नाचे पूर्ण उत्तर वाचायला वेळ नसतो. तुझ्या उत्तरात नेहमीची आकृती दिसली नाही की तो असा निष्कर्ष काढेल की तुझे उत्तर चुकीचे आहे व तुला शून्य मार्क मिळतील!'' आपल्या परीक्षापद्धतीवर ही घटना प्रकाशझोत टाकून जाते.

एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. मी जेव्हा प्रायमरीतून सेकंडरी विभागात प्रवेश केला तेव्हा काही सहकाऱ्यांनी माझ्या वडिलांना सल्ला दिला, की त्यांनी मला एखाद्या प्रख्यात व इंग्लिश मीडीयम असलेल्या शाळेत, बनारसबाहेरही घालावे. माझा एक सहाध्यायी मसूरीतल्या एका बोर्डिंग स्कूलमध्ये दाखल झाला होता तर आणखी काही बनारसमध्येच गावातल्या मोठ्या शाळेत जाणार होते.. जिथे इंग्रजी माध्यम वापरले जाई. अशा शाळांच्या तुलनेत माझी शाळा साधी व हिंदी माध्यम वापरणारी होती. तसेच एकंदरीत दीर्घ वय नसलेल्या ह्या शाळेला दीर्घ परंपराही अजून नव्हत्या... **त्या आम्ही विद्यार्थ्यांनीच आपल्या कर्तृत्वाने निर्माण करायच्या होत्या.**

माझ्या वडिलांनी मला मसूरी-डेहराडूनच्या एखादया प्रख्यात शाळेत न पाठविता मी होतो त्या सध्याच्या शाळेतच पाठवायचा निर्णय घेतला. कारण त्यांच्या मते माझी शाळा एका शैक्षणिक वसाहतीत होती आणि शिक्षणक्षेत्रात वावरणाऱ्या मध्यम वर्गाची प्रतीक होती. एखादया 'बड्या' शाळेत पाठवून जेथे उच्चस्तरावरील (पैसा किंवा अधिकारशाहीच्या मापदंडानुसार!) समाजातील मुले येतात; तेथे **माझी जीवनमूल्ये वेगळी करायचा त्यांचा विचार नव्हता. मी ज्या वातावरणात जन्मलो आणि वाढत होतो त्यातच माझे शिक्षण चालू राहावे असे त्यांनी ठरविले.**

आज शहरातील मध्यमवर्गाला इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे आकर्षण भुरळ घालत आहे. इंग्रजीमुळे पुढील करीयरकरिता चांगली साथ मिळते, बोलण्या-चालण्यात वेगळे 'पॉलिश' येते इत्यादी कारणे सांगून त्याचे समर्थन केले जाते. मला ह्या कारणांत फारसे तथ्य वाटत नाही. हिंदी वातावरणात वाढल्यामुळे मला व अनंतला हिंदी भाषा मातृभाषेप्रमाणेच जवळची झाली होती. **शिक्षण मातृभाषेत अधिक सहजगत्या होते, कारण विचार करण्याची व विचार मांडण्याची ती भाषा!** मला इंग्रजी दुसरी भाषा म्हणून तिसरी ते मॅट्रिकपर्यंत शिकायला मिळाली. तोपर्यंत इंग्रजी बोलण्यात नसली तरी बोललेले समजून घेण्यात मला बऱ्यापैकी परिपक्वता लाभली होती. म्हणून इंटरमीजिएट क्लासेस पासून (म्हणजे आजचे ज्युनियर कॉलेज!) इंग्रजी माध्यम सुरू झाले तरी मला कसलीही अडचण वाटली नाही. तसेच **हिंदी माध्यमातून शिक्षण झाल्यामुळे माझ्या करियरमध्ये कसलीही उणीव राहिली नाही असे आज मागे वळून पाहताना वाटते.**

***

*मला वाटते आत्मविश्वास ही गुरूकडून शिष्याला मिळू शकणारी सर्वांत महत्त्वाची देणगी आहे. ज्याप्रमाणे पाण्यात पडल्याशिवाय पोहायला शिकता येत नाही, त्याचप्रमाणे अभ्यासक्रमातले प्रश्न स्वतः सोडवायची ऐपत आल्याशिवाय विषय समजत नाही. विद्यार्थ्यांना चमच्याने ज्ञान भरवण्यापेक्षा त्यांच्यामध्ये जिज्ञासेपायी ते स्वतः मिळविण्याची उत्कंठा उत्पन्न करणे आणि त्यासाठी धडपड करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात आणणे ही शिक्षकांपुढे असलेली आव्हाने आहेत.*

***– डॉ. जयंत नारळीकर***

* *दि. १९ जुलै (१९३८) हा डॉ. जयंत नारळीकर यांचा वाढदिवस आहे.* *